

# वर्णमुद्रा

## पब्लिशर्स

**शेगाव, जि. बुलढाणा**

**(ऑगस्ट २०१९ ते डिसेंबर २०२३)**

# नो युवर ऑथर उपक्रम

पाच वर्षांपूर्वी आम्ही तीन मित्रांनी ‘कॉपर कॉइन पब्लिशिंग’ नावाची प्रकाशन संस्था काढून मराठी, हिंदी, पंजाबी व इंग्रजी अशा चार भाषांमधली पुस्तके प्रकाशित करण्याचा प्रयत्न केला. संस्थेचा मुख्य भर कवितांची पुस्तके काढणे व कवी आणि कवितेला साहित्यव्यवहाराच्या केंद्रस्थानी आणणे हा होता. ह्याला तत्कालीन कारण असे घडले होते की २०१२-१३ च्या दिल्लीतील जागतिक पुस्तक मेळा (वर्ल्ड बूक फेअर) ला मी व सरबजीत गरचा हा कविमित्र गेलो असता दिल्लीतीलच एका नामवंत प्रकाशन संस्थेची हिंदी कवितेच्या पुस्तकांची दयनीय निर्मिती पाहून आम्ही व्यथित झालो. त्या तुलनेत पेंग्विन, राऊटलेज, रूपा ह्या प्रकाशन संस्थांच्या पुस्तकांची निर्मिती ही दर्जेदार व टिकाऊ स्वरूपाची होती. किमान कवितेला तरी देखण्या रंगरूपात सामोरी आणण्यात प्रकाशकांच्या काय अडचणी आहेत यावर विचार केला असता असे लक्षात आले की, मुळात कवितेचा वाचकवर्ग हा सीमित आहे व त्यामुळे प्रकाशकांचा जेमतेम खर्चच कवितांच्या पुस्तकांतून निघाला तर निघाला नाही तर कविता प्रकाशित करणे हा एक आतबट्ट्याचा व्यवहार ठरतो.

ह्यावर उपाय म्हणून नजरेसमोर दोन पर्याय उभे होते, एक केरळ राज्याच्या धर्तीवर कवी-लेखकांनीच सहकारी तत्त्वावर प्रकाशन संस्था चालवून पुस्तके प्रकाशित करणे व दोन आपणच पुढाकार घेवून पदरमोड करून किमान ना नफा ना तोटा तत्त्वावर कवितांची पुस्तके काढणे. आम्हाला दुसरा पर्याय सोयीचा ठरल्याने आम्ही तो निवडला व गेल्या पाच वर्षांत नाही म्हणता म्हणता चारही भाषांतून महत्त्वाची व दुर्लक्षित कविता सुद्धा आवर्जून पुढे आणली. ह्यात मराठी भाषेतील तुळसी परब, वसंत आबाजी डहाकेंसारखे दिग्गज कवी जसे होते तसेच सलील वाघ, राही डहाके, रवींद्र दामोदर लाखे ते विनायक येवले, महादेव गोरख कांबळेसारख्या युवा कवीपर्यंत आणि पुढे वर्तमानकालीन युवा महिला कवयित्री प्रिया जामकर, शर्मिला रानडे, सुप्रिया आवारे व विशाखा विशाखा ह्या सुद्धा होत्या.

आता ‘कॉपर कॉइन’ला वेगळे करून त्यातून वर्णमुद्रा पब्लिशर्स ही वेगळी निर्मिती का करावी लागली इ. बाबी विशद करणे इथे अप्रस्तुत आहे व ते अस्थानी सुद्धा ठरते.

महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, पुस्तके प्रकाशित करताना एक बाब अशी ध्यानात आली की,वाङ्मयाची आवड असणाऱ्या सर्वच मराठी भाषिकांना जागतिक स्तरावरील महत्त्वाच्या कवी-लेखकांच्या कलाकृतींची पुरेशी ओळख होतच नाही व त्यामुळे इच्छा असूनही रसिक वाचक अगदी कवी लेखक सुद्धा आपल्या भाषेच्या परिघाबाहेर पोहोचत नाहीत. गेल्या काही वर्षांत मराठीतील नामवंत प्रकाशनसंस्था पाश्चात्त्य साहित्याच्या अनुवादांकडे वळल्या आहेत ही एक आशादायक बाब आहे, पण ती पुस्तके ललित साहित्याची कथा कादंबरी स्वरूपाची असून सरळ सरळ अनुवाद अशा स्वरूपाची आहेत. त्यातून लेखकाच्या कार्यकर्तृत्वाची ओळख पुरेशी पटणे जरा कठीणच आहे.


(पुढील मजकूर पान क्र. १० वर)





बेकेट : आय डोन्ट नो
म्हणतो म्हणून
संपादन : गणेश कनाटे
३००/– निबंध





अवकाश आसा
सुरेश कदम
३१५/– कविता




उत्तरायण
हेमंत गोविंद जोगळेकर
२८०/– कविता





जिव्हार
रवींद्र दामोदर लाखे
१७०/– कविता





आस्वाद भावलेल्या कवितांचा
डॉ. सुधीर देवरे
२५०/–समीक्षा





पाण्यारण्य
दिनकर मनवर
३८०/–




कुणीच कसे बोलत नाही
अशोक कोतवाल
२८०/–कविता





डोंगरावर कंदील
मंगलेश डबराल, रूपांतर : वर्णमुद्रा
१७०/– कविता





चंदनाची शिडी
चंद्रकांत देवताले, रूपांतर : वर्णमुद्रा
२३५/–कविता





काळोखाच्या कविता
नामदेव कोळी
२५०/–कविता




यानिस रित्सोस यांच्या निवडक कविता
अनुवाद : मनोज सुरेंद्र पाठक
२२०/– कविता




मुलखावेगळ्या मुलाखती
अनुवाद : दीपक बोरगावे
४२४/– मुलाखती





कर्कवृत्त
वसंत आबाजी डहाके
३२५/– कविता




जीवे लागणीच्या कविता
रवींद्र लाखे
२५०/–कविता




बायबलमधील स्त्रिया
अनुपमा उजगरे
४२४/– निबंध




अग्निपरीक्षेचे वेळापत्रक
यशवंत मनोहर
४५४/–कविता





सटल्
अनिरुद्ध आचार्य
१४०/– कविता




तृष्णाकर्ष
तेजस मोडक
२१४/– कविता




सॅक्सोफोन हे वरातीत
वाजवायचे वाद्य नव्हे
गणेश वामन कनाटे
३००/–, कविता





चल भटकू विस्कटू धावू
प्रिया जामकर
२२४/–, कविता





केपकॉड
हेन्री डेव्हिड थोरो, भगवंत क्षीरसागर
३६४/–, प्रवासवर्णन–अनुवाद




मला पुष्कळ होड्या येतात
हेमंत गोविंद जोगळेकर
४५०/–, कविता




सर्व अंशांतून आपण
The coordinates of us
संकेत म्हात्रे–रोशेल पोतकर
२८०/–, द्वैभाषिक कविता




तत्त्वज्ञानी बुद्ध
यशवंत मनोहर
५५०/– निबंध





सत्याचे सौंदर्य आणि सौंदर्याचे सत्य
यशवंत मनोहर
२५०/– निबंध




समजूतदार जाणिवांचे कवडसे
बाळकृष्ण सोनवणे
३५०/–, कविता





एक नवं जग
उत्तम कोळगावकर,
३५०/– कविता





वामांगी
दिनकर मनवर,
३०४/– कविता




ऑर्वेलिया
संपादन : मनोज सुरेंद्र पाठक
४००/– निबंध





इथपर्यंत येताना
कुमार अंबुज–अनुवाद राजा होळकुंदे
४००/– कविता





नायिकेचा आदिबंध
सुप्रिया आवारे
५५०/– समीक्षा–संशोधन




युद्धरत
शशिकांत हिंगोणेकर
४००/– कविता




उरलेल्या आयुष्यात
हेमंत गोविंद जोगळेकर
२२४/– कविता




आई मन्या आणि राक्षस
दिनकर मनवर
३००/– कविता




राहुल पुंगलियाच्या कविता (१)
राहुल पुंगलिया
३२५/– कविता





शतकोत्तरी ओरखडा
राजीव जोशी
४००/– कविता





पाण्यारण्य : तृष्णेची शोधयात्रा
(आदिबंधात्मक अन्वयार्थ)
भरतसिंग पाटील
३५०/– समीक्षा




'सोलेदाद'शी प्रदीर्घ संवाद
संजय आर्वीकर
३३०/– मुलाखत




जीए : अज्ञेयाचे यात्रिक
(आदिबंधात्मक शोध)
भरतसिंग पाटील
६००/– समीक्षा





सुन्नतेचे सर्ग
गोविंद काजरेकर
२८०/– कविता




चिमण्या टरफले आणि सैगल
श्रीपाद भालचंद्र जोशी
२००/– एकांकिका




सुवर्णपर्वताच्या पल्याड
आणि इतर एकांक
श्रीपाद भालचंद्र जोशी
१८०/– एकांकिका




नवं जग नवी कादंबरी
विश्राम गुप्ते
५०४/– समीक्षा




आवर्तने
(कविता–आशय–आकलन)
चं.प्र. देशपांडे
४५०/– समीक्षा





आपुला ठावो न सांडिता
सुरेंद्र दरेकर
४००/– कथासंग्रह





पूर्वप्रभा आणि पश्चिम आभा
शिरीष चिंधडे
४२४/–
पुस्तक आढावा–ओळखपर लेख





ईश्वर मला गुणगुणतो दीप रागासारखा
बाबुषा कोहली
अनुवाद : रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ
३०४/– कविता





शुन:शेप
वसंत आबाजी डहाके
हिंदी अनुवाद : प्रेरणा उबाळे
३००/– कविता





अर्ज मोठा नामी
(पाच मुक्त नाटिका)
अरविंद विश्वनाथ
२९४/– नाटिका




आदिबंधात्मक समीक्षा
डॉ. म. सु. पाटील
४०४/– समीक्षा




इकडे सर्व ठीक आहे. काळजी नसावी
वसंत आबाजी डहाके
४०४/– एकांक व लघुतम नाटके




सार्थ
संपादन, मनोज सुरेंद्र पाठक
४६४/– निबंध



ते कोण लोक आहेत
पांडुरंग सुतार
३७४/– कविता




निवडक कविता
सलील वाघ
३५०/– कविता





लकडी पूल ते लंडन पूल
शिरीष चिंधडे
४८४/– प्रवासवर्णन




रागविराग
वसंत केशव पाटील
४५०/– कविता





दीर्घ
गणेश वामन कनाटे
४४४/– समीक्षा





हद
तुळसी परब
४५०/– कविता





बिलामत
दिनकर दाभाडे
५५०/– कादंबरी




झुरळ आणि इतर काहीबाही
प्रमोदकुमार अणेराव
३२४/– कथासंग्रह




अभिजात
शैलेंद्र मेहता
५२५/– निबंध





जगणं वाचणं
डॉ. राजेंद्र मलोसे
४४४/– कादंबरी




हजार रक्तवर्णी सूर्य
राही डहाके
२४२/– कविता





जगावेगळी जीवने
शिरीष चिंधडे
३२४/- निबंध





केवळ काही वाक्यं
उदयन वाजपेयी
अनुवाद : प्रफुल्ल शिलेदार
३०४/- कविता




अश्वत्थयुग्मांचे श्लोक
संतोष विठ्ठल घसिंग
५७५/- कविता




तरंगत तरंगत जाऊ घरंगळत
हेमंत गोविंद जोगळेकर
२२४/- कविता





दुराव्याची धूळ व्यापून
बाळकृष्ण सोनवणे
२५०/- कविता





अपरंपारावरच्या कविता
रवींद्र दामोदर लाखे
३०४/- कविता




तत्त्वभान
श्रीनिवास हेमाडे
६८०/- निबंध




गनिमी काव्याचे नमुने
विश्वास कणेकर
३००/- कविता




पेसोआच्या कविता
महेश्वर लव्हेकर
४२४/- अनुवादित कविता




वुहानचा वाफारा
विजय तांबे
४२४/- कथा




सृजनस्त्रोत
शिरीष चिंधडे
४२४/- ओळखपर लेख

(पान क्र. २ वरून पुढे)

यावरील उपाय म्हणून वसंत आबाजी डहाके सर व मी सहज चर्चा करीत असताना त्यांनी परदेशातील 'नो युवर ऑथर' या प्रकाराचा उल्लेख केला व सर पुढे म्हणाले की, खरं म्हणजे महत्त्वाचा एक एक कवी लेखक घेऊन त्याविषयी एक दिवस, दोन दिवस चर्चा घडवून आणली पाहिजे. आपल्या मराठीतच दुर्लक्षित राहून गेलेले असे कितीतरी कवी लेखक आहेत. उदाहरणार्थ रजनी परूळेकर, वसंत दत्तात्रेय गुर्जर, प्रकाश जाधव, सदानंद रेगे, अगदी ढसाळांचाही विचार केला तर त्यांचेवरील कामही अपूर्ण आहे, तुळसी परब आहे, खूप आहेत. पण कुणी आणि कधी करावं हे काम?

यानंतर आम्ही बराच वेळ गप्प राहिलो व हळूहळू आम्हा दोघांच्याही मनातून ही 'नो युवर ऑथर' संकल्पना आकाराला येत गेली. काय आहे ही संकल्पना व तिचे गेल्या वर्षभरातील फलित काय आहे ते ऐका :

सुरुवात जरी मराठी-कवी लेखकांपासून झाली होती तरी प्रत्यक्ष चर्चासत्र घेताना असा विचार मनात आला की, जागतिक स्तरावरील अत्यंत महत्त्वाचे कवी-लेखक अजूनही मराठीला पुरेसे माहिती नाहीत. उदाहरण घ्यायचे तर विलास सारंगांनी त्यांच्या 'सिसिफस आणि बेलाक्का' या पुस्तकात काफ्का, सॅम्युएल बेकेट, सार्त्र यांचेविषयी संक्षिप्त लिहिल्यानंतर पुढे फार काही मराठीत आढळतच नाही. तेव्हा सुरुवात आपण सॅम्युएल बेकेटपासून करूयात.

दोन वर्षांपूर्वी शेगाव जिल्हा बुलडाणा येथे सॅम्युएल बेकेट या अस्तित्ववादी लेखकावर अत्यंत यशस्वी असे चर्चासत्र दिनांक २ व ३ नोव्हेंबर २०१८ रोजी पार पडले. बेकेटचे अभ्यासक मा. गणेश कनाटे, ठाणे; डॉ. दीपक बोरगावे, पुणे; डॉ. अरविंद विश्वनाथ, अकोला; दत्ता चव्हाण, परभणी व डहाके सर स्वतः यांनी निबंध वाचले. उपस्थित मोजक्या पंचवीस सहभागींनी विविध अंगाने बेकेट यांच्या साहित्यावर चर्चा केली. त्या चर्चासत्राचे फलित म्हणून 'बेकेट आय डोन्ट नो म्हणतो म्हणून' ही पुस्तिका ऑगस्ट २०१९ मध्ये प्रकाशित करण्यात आली.

शेगावच्या चर्चासत्रात एक त्रुटी अशी निदर्शनास आली की, इथे फक्त ३० लोक चर्चेत सहभागी झाले होते, परंतु हेच चर्चासत्र जर का एखाद्या महाविद्यालयात विद्यापीठात असते तर काही विद्यार्थी सुद्धा त्यात सहभागी होऊ शकले असते.

म्हणून पुढे मार्च २०१९ मध्ये 'दस्तएवस्की'वरील चर्चासत्र नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात घेतले व ऑगस्ट २०१९ मध्ये नागपूरला हिस्लॉप महाविद्यालयात 'जॉर्ज ऑर्वेल'वरील चर्चा पार पडली. ह्या दोन्ही पुस्तिकांची निर्मितीची कामे यथावकाश सुरू आहेत. आता दिनांक ४ व ५ जानेवारी २०२० मध्ये औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात 'सार्त्र'वर चर्चा आयोजित केली असून पुढील चर्चा एक वर्षासाठी मराठीकडे किंवा भारतीय भाषांतील लेखकांकडे वळविण्याचा विचार सुरू झाला आहे. सार्त्रनंतर कदाचित मराठीतील ग. त्र्यं. देशपांडे यांचेविषयीचे चर्चासत्र असेल.

चर्चासत्राचे थोडक्यात स्वरूप असे असते :

- प्रथम येणारे प्रथम या अग्रक्रमाने फक्त पहिल्या तीस लोकांची नोंदणी करण्यात येते. (यापेक्षा जास्त लोकांची व्यवस्था करणे शक्य नसल्याने)
- नोंदणी शुल्क १५००/-(बाहेरील व्यक्तींना निवास व भोजन व्यवस्थेकरिता) व १०००/- (स्थानिक व्यक्तींना निवास व्यवस्था वगळून) आकारले जाते.

- स्थानिक व बाहेरील सुद्धा निवडक विद्यार्थी यात निःशुल्क सहभाग घेऊ शकतात.
- नोंदणी पूर्ण झाल्यानंतर सुद्धा काही निवडक व्यक्ती निवास व भोजन व्यवस्था न स्वीकारून चर्चासत्रात सहभागी होऊ शकतात.
- हा एक निखळ ज्ञानसाधनेचा प्रयत्न आहे व तो फक्त लहान ऑडेटोरियम, दोन माईक, पन्नास खुर्च्या, पाच टेबले अशा साहित्याचा संस्थेकडून सहभाग घेऊन व निवास, भोजन व्यवस्थेचे शुल्क भरूनच साजरा करण्यात येतो. निवास, भोजन व्यवस्थेचे प्रायोजकत्व स्वीकारले जात नाही.
- सहभागी वक्ते व तज्ज्ञ व्यक्तीसुद्धा विना मानधन व सहभाग शुल्क भरूनच यात सहभागी होत असतात.
- कार्यक्रम हारतुरे, दीपप्रज्वलन, स्वागतगीते, शाली–श्रीफळे विरहित असतो.

आता प्रकाशित झालेल्या 'बेकेट आय डोन्ट नो म्हणतो म्हणून' या पुस्तिकेची थोडक्यात माहिती अशी देता येईल की, ज्या मराठी वाचकांना आवड व आस्था आहे पण जे इंग्रजीतून अशा कवी–लेखकांपर्यंत पूर्णपणे पोहोचू शकत नाहीत अशा वाचकांसाठी बेकेट कोण होता, साहित्यात त्यांचे लिखाणाचे महत्त्व काय, लेखनामागील जीवनदृष्टी काय होती इ. बाबींचा उलगडा करून दाखविणारे हे पुस्तक आहे. थेट इंग्रजीतून वाचणाऱ्या वाचकांना या पुस्तिकेचा फारसा उपयोग नाही. उलट अशा अभ्यासकांनी चर्चासत्रात सहभागी होऊन मराठी वाचकांना आपल्याला असलेली माहिती पुरविण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

सदर पुस्तकाचे संपादन गणेश कनाटे या अभ्यासक मित्राने केले असून स्वतः 'का वाचायचा सॅम्युएल बेकेट?' व 'बेकेट आणि तत्त्वज्ञान' ही दोन टिपणे लिहिली आहेत. त्यातून बेकेटचे जागतिक पातळीवरील महत्त्व व चिंतनशील तत्त्वज्ञ म्हणून बेकेट यांचे अनन्यसाधारण महत्व यावर प्रकाश पडतो. डॉ. दीपक बोरगावे यांनी 'अॅब्सर्डिटी आणि वेटिंग फॉर गोदो' या टिपणातून बेकेट यांच्या समग्र चिंतनाला व्यापून असलेल्या निरर्थकतेचा लक्षणीय वेध घेतला आहे. दत्ता चव्हाण या मित्राने बेकेट यांचा चरित्रपट संक्षिप्त पण नेटकेपणाने मांडला असून 'वेटिंग फॉर गोदो' ही कलाकृती काळाच्या पटलावर अक्षर वाङ्मय म्हणून कशी उभी राहते हे सांगितले आहे. डॉ. अरविंद विश्वनाथ यांनी 'बेकेटकुळातील इतर लेखक' या टिपणातून अॅब्सर्डिटी ही भावना केवळ बेकेटलाच जाणवली होती असे नसून थेट शेक्सपिअर ते मराठीतील खानोलकरांपर्यंतचे लिखाणात कसा कसा या भावनेचा स्पर्श जाणवत राहतो हे विशद केले आहे. वसंत आबाजी डहाके यांनी 'वेटिंग फॉर गोदो : सूक्ष्म वाचन' हा निबंध म्हणजे एखाद्या कलाकृतीकडे किती विविध पद्धतीने पाहता येऊ शकते याचा वस्तुपाठच ठरावा अशा रीतीने सादर केला आहे. केवळ हा एक निबंधच मुळातून वाचण्यासाठी व अनुभवण्यासाठी वाचकांनी हे पुस्तक आवर्जून मिळवून वाचावे असे मी म्हणतो व थांबतो.

**– मनोज सुरेंद्र पाठक**
**मुख्य संपादक, 'वर्णमुद्रा पब्लिशर्स'**

कला हा आपण स्वीकारलेला एक जीवनमार्ग असतो.
एका अनामिक वा प्रबळ ओढीने आपण त्याकडे ओढले म्हणा
अथवा ढकलले जात असतो. या वाटेने जाणाऱ्या
प्रत्येकालाच लौकिक यश मिळेल याची जशी खात्री देता येत नाही,
तसेच वैयक्तिक समाधान मिळेल असेही नाही.
पण ही ओढ इतकी प्रबळ असते की, पुढेपुढे तर या
दोन्ही गोष्टीही अतिशय किरकोळ वाटू लागतात आणि
त्याच वाटेने जात राहणे हीच अंतिम फुलफिलमेंट ठरते.

**जी. ए. कुलकर्णी**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . .

आपल्या अस्तित्वाच्या तुकड्यातुकड्यांचे
काम करीत भाषेच्या सडसडण्याचा आवाज
ऐकणे, याशिवाय दुसरे काहीही नव्हते करण्यासारखे.

**वसंत आबाजी डहाके**



**वर्णमुद्राची पुस्तके मिळविण्यासाठी :**

VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

**किंवा**

**वर्णमुद्रा पब्लिशर्स, ‘पृथक’, रामकृष्ण सोसायटी, एसबीआय कॉलनी, दत्त मंदिराजवळ, शेगाव, जिल्हा बुलढाणा – ४४४२०३**
**मोबाईल क्रमांक : ९९२३७२४५५०**
**इमेल :** varnamudra.editors@gmail.com
**वेबसाईट :** http://www.varnamudra.com/